# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १८८-२२** **दिनांक :- २२/०६/२०२२**

## फायरींग करुन लुटमार करणा-या आरोपीतांना १२ तासात अटक करुन गावठी कट्टा व ३ जिवंत काडतूस हस्तगत - पेल्हार पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दिनांक- २१/०६/२०२२ रोजी सकाळी ०९.०० वा.चे सुमारास तक्रारदार हे त्यांचेकडील असलेल्या बॅगमध्ये ५०,०००/- रुपये घेवुन शानबार नाका येथे रिक्षातुन उतरत असतांना ०९.३० वा.चे सुमारास दोन अनोळखी इसमांनी मोटर सायकल वरुन येवुन त्यापैकी मागे बसलेल्या इसमाने तक्रारदार यांचे बॅगेमधील ५० हजार रुपये जबरीने खेचुन नेण्याचा प्रयत्न करित असतांना तक्रारदार यांनी त्यास विरोध केला असता, तक्रारदार यांना जिवेठार मारण्याच्या उद्देश्याने आरोपीत याने त्याच्याकडील गावठी कट्टयाने तक्रारदार यांच्यावर गोळीबार करुन जबर दुखापत करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. घडलेल्या घटनेबाबत तक्रारदार श्री प्रजापती रा. नालासोपारा (पु.), ता. वसई, जि. पालघर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पेल्हार पोलीस ठाणे गु.रजि.नं. I ५४२/२०२२ भा.दं.वि.सं. कलम- ३०७, ३९८, ३४ सह भारतीय शस्त्र अधिनियम-१९५९ चे कलम ३, २५, २७ सह महाराष्ट्र पोलीस अधि.३७ (१)(३) /१३५ प्रमाणे दिनांक २१/०६/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ यांचे आदेशान्वये व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली लागलीच चार वेगवेगळी पथके तयार करुन आरोपीत यांचा शोध घेण्याबाबत सुचना देण्यात आल्या. गुन्हयाचे घटनास्थळावर पेल्हार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ घटनास्थळास भेट देवुन तांत्रिक पुरावे हस्तगत करुन आरोपीत यांचेबाबत प्राथमिक माहिती प्राप्त केली. मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीत यांचा माग काढत शोध घेतला असता आरोपीत हे धानिव गावचे पाठीमागील सर्वे नं. ५ व ६ चे लगत असलेल्या वनविभागाचे डोंगरात वेगवेगळया दिशेने पळाले असल्याची माहिती मिळाली. सदर ठिकाणी त्यांच्यातील एक आरोपी हा जंगलात लपुन बसलेला असतांना त्यास सापळा रचुन शिताफिने ताब्यात घेण्यात आले. त्याचेकडुन मिळुन आलेल्या माहितीचे आधारे इतर दोन आरोपीत यांना दिनांक २१/६/२०२२ रोजी अटक करण्यात आली असुन अटक आरोपीत यांची नावे १) मो. उवैश ऊर्फ जावेद समीम खान, २) रविंद्र अंकुश निगुडकर, ३) सद्दाम करमहुसेन खान, रा. नवजीवन, वसई पुर्व, मुळ रा. उत्तरप्रदेश अशी आहे. नमुद आरोपीतांकडुन गुन्हा करण्याकरीता वापरलेला ०१ **गावठी कट्टा, ०३ जिवंत काडतुस, ०२ मोटर सायकल असा एकुण-७५,६००/- रुपये** किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सदर गुन्हयाचा पुढिल तपास चालू आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - ३, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.उप.नि./सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पो.ना./ प्रताप पाचुंदे, पो.अं/ संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, रोशन पुरकर, किरण आव्हाड, बालाजी गायकवाड, पोहवा/नामदेव ढोणे नेम.सपोआ कार्यालय, विरार यांनी केली आहे.

-------ooo-------